सोमवार, दि. ३० जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अमान्य... मान्य... अमान्य... आवाज अन् गोंधळात शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा गुंडाळली

## विद्यमान संचालकांचाही काही ठरावांना विरोध; सभेचा केला निषेध; अध्यक्षांनी आरोप फेटाळले

**जालना | प्रतिनिधी – अमान्य... मान्य... अमान्य... आवाज अन् गोंधळात त्याच बरोबरच काही विद्यमान संचालकाच्या निषेधाने जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या जालनाची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि २९) रोजी पार पडली. जुना जालना भागातील एका कार्यालयात ही वार्षिक सर्वसाधारण सभा गुंडाळण्यात आली.**

सभेत वार्षिक लेखा परिक्षण हे शासकीय लेखा परिक्षकामार्फत व्हावे अशी मागणी सभासदांनी लावून धरली. खाजगी लेखा परिक्षकांकडून लेखा परिक्षण करून घेण्यामागे संस्थेंच्या संचालकांचे आर्थिक हित असल्याचा आरोप सभेसमोर काही सभासदांनी केला. महत्त्वाचे म्हणजे हे लेखा परिक्षक संस्थेच्या अध्यक्ष-सचिवांना ५०टक्के रिटर्न गिफ्ट देत असल्याचा गंभीर आरोप यावेळी केला. पतसंस्थेत चार-पाच कर्मचारी आहेत. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांकडून सभेचे इतिवृत्त हे सर्वांसमोर लिहून घेतले गेले पाहिजे. त्यात सभासदांचे म्हणणे त्यात मांडणे आवश्यक असल्याचेही काही सभासदांनी सभेत म्हटले. संस्थेचे सचिव कोठे आहेत ते का बोलत नाहीत, असा प्रश्नही यावेळी काहींनी उपस्थित केला.




एकीकडे सभासदांकाडून सभेत आरोप होत असतांना दुसरीकडे चेअरमन विकास पोथरे यांनी सर्व आरोप धुडकावून लावत सभा सर्व ठराव मंजूर करून संपन्न झाल्याचे शेवटी घोषित केले.


चेअरमन विकास पोथरे

जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या जालनाची ४४ वी सर्वसाधारण सभा व्यव्यस्थित पार पडली. सर्व ठराव बहुमतांनी मान्य करण्यात आली. विविध कल्याणकारी योजना, विविध प्रकारचे कर्ज, कर्ज वसुलीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे, शासकीय ऑडीटर कडून ऑडीट व्हावे अशी सभासदांची मागणी आहे याबद्दल बोलतांना चेअरमन श्री पोथरे यांनी संस्थेचे ऑडीट सरकारी पॅनलवरील लोकं निवडले जातात तो संचालक मंडळ निर्णय घेतो ते सर्वसाधारण सभेत ठेवले जाते तेथे त्याला मान्यता मिळते असे म्हंटले तर कंत्राटी भरती सातत्य दिले या विषयी सभासदांच्या आक्षेपाबाबदत विचारले असता, कंत्राटी भरती केलेल्यांना सेवा सातत्य दिले असल्याचे चेअरमन विकास पोथरे यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले.

वार्षिक सर्वसाधारण सभेत विरोधक म्हणून सभासदांचा आवाज या ठिकाणी मांडला, नोकर भरती कंत्राटी पद्धतीने व्हावी असा ठराव झाला होता. मात्र, संचालकांनी अंधारात ठरावात बदल करून कंत्राटी पदे कायम करण्याचे ठरवले. विशेष म्हणजे वार्षिक सर्वसाधारण सभेत जे ठराव विषय मांडले जातात ते विषय पत्रिकेत मांडावे लागतात. शासकीय ऑडीटर मार्फत ऑडीट करण्याची मागणी केली. खाजगी ऑडीटर हा चुकीच्या गोष्टी मान्य करतो, सेवा सातत्य व कंत्राटी करण्याला कायम करण्याचा ठराव कुठेही आम सभेसमोर आले नाही. ऑडीट फी मध्ये दोन लाख रुपयांचा फरक पडला आहे. खाजगी ऑडीटर मध्ये घोटाळा होतो त्यामुळे शासकीय ऑडीटर यांना नको, शंभर सभासदांच्या सहीचे निवेदन विरोध म्हणून देण्या येणार आहे.



**देवेंद्र बारगजे, संस्थेचे संचालक**

पतसंस्थेची ४४ वी सर्वसाधारण सभा होती सभासदांची मागणी होती की, प्रोसेडींग ही लिहिल्या गेली पाहिजे. पतसंस्थेत चार-पाच कर्मचारी आहे अशावेळी सर्वांसमोर सर्वसाधारण सभेत प्रोसेडींग लिहिल्या जात नसेल तर ते खरचं पारदर्शी आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. आम्ही सरकारी कर्मचारी आहोत आमच्या पतसंस्थेचे ऑडीट हे सरकारी ऑडीटर करूनच व्हावे अशी आमची मागणी आहे. कंत्राटी कर्मचारी म्हणून जाहीरात दिली आणि नंतर त्यांना स्थायी करायचे, उपस्थित असलेल्या सभासभांच्या सह्या प्रोसेडींगला लावल्या जातात. सभासदांची दिशाभूल केली जाते. मनमानी निर्णय घेतले जातात, याचा निषेध



**सीमा काकडे- गंगाधरे,**
**जिल्हाध्यक्ष अखिल महाराष्ट्र**
**प्राथमिक शिक्षक संघ (महिला विंग)**



आम्ही वेळोवळी संचालकांच्या बैठकीत सरकारी ऑडीटर करून ऑडीट व्हावे अशी मागणी केलेली आहे. मात्र, त्यास बगल देण्यात आली. आजच्या सर्वसाधारण सभेतही सभासदांनी ही मागणी लावून धरली त्यास अवाजवी मतांनी मागणी फेटाळली याचा मी निषेध करतो.

**रघुनाथ वाघमारे,**
**विद्यमान संचालक**

या आम सभेत विविध प्रश्न उपस्थित केले गेले मात्र, विद्यमान संचालकांकडे उत्तर नसल्यामुळे त्यांनी सभा थोडक्यात गुंडाळली. त्यांनी सुरवातीला सांगितले संस्थेला दोन कोटी सत्त्याहत्तर लाख नफा झाला. मात्र, कार्यालयीन खर्च मोठ्या प्रमाणात होत आहे. साध्या साध्या बाबींवर लाखो खर्च होतो आहे. प्रत्येक वर्षी एक लाख रुपये निघतो, सभासदांचा लाभांश कमी होत आहे. ही सभा त्यांनी गुंडाळली जरी असली तरी पुढील सर्वसाधारण सभेत प्रश्नांची उत्तरे मिळावी यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या सर्वसाधारण सभेचा मी विरोध करतो.



**भानूदास काशिनाथ लोखंडे**

सत्ताधाऱ्यांनी कोणतेही प्रोसेडींग रजिस्टर समोर आणले नाही. कोणताही ठराव सभासदांसमोर मांडले नाहीत. बोगसरित्या ठराव मंजूर करून घेतल्या जातात. या अगोदरच्या सभेतही असेच घडले आहे. त्यामुळे आम्ही याठिकाणी एक व्हिडीओ कॅमेराही लावला व सभासदासमोर सर्व काही निदर्शनास आणले आहे.



**मधूकर लिंबाजी काकडे, विद्यमान संचालक**

खाजगी व्यक्ती करून लेखा परिक्षण केले जाते. मुळात शासकीय कर्मचाऱ्यांची ही पतसंस्था आहे. त्याचे ऑडीट देखील हे शासकीय लेखा परिक्षकांकडून झाले पाहिजे असा प्रश्न आहे. ते प्रोसेडींगला घेतले नाही. वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या. विद्यमान अध्यक्ष विकास पोथरे यांनी सारवासारव केली. शिक्षकांच्या कष्टाचा पैसा या पतसंस्थेत आहे. यांना शासकीय लेखा परिक्षक आणि खाजगी लेखापरिक्षक यांच्या फरक कळत नाही. त्यांच्या बुद्धीची मला किव येते. सर्व मिळून एक कॅम्पन सुरु करू शासकीय लेखा परिक्षकांकडून ऑडीट व्हावे.



**मुकुंद खरात, जिल्हाध्यक्ष प्रहार शिक्षक संघटना**

विरोधी पक्ष या नात्याने सत्ताधाऱ्यांना मागणी होती ऑडीट हे सरकारी ऑडीटर करून व्हावी, कारण दरवर्षी सद्या देण्यात येणाऱ्या ऑडीटरचा खर्च हा लाखोंने वाढत आहे, यात संचालक मंडळ घोटाळा करत आहेत. त्यामुळे सरकारी ऑडीटर करून ऑडीट व्हावे अशी आमची मागणी आहे. संस्थेत पारदर्शकता आणावी. बोगसरित्या ठराव मंजूर करुन घेण्यात येत आहे. त्यास आमचा विरोध आहे. सभासदांच्या हितासाठी संघर्ष करत राहणार आहे. सभासदांनही शासकीय ऑडीटर करून ऑडीटची मागणी लावून धरावी अशी विनंती त्यांनी यावेळी सभासदांना केली.



**रामभाऊ तुकाराम मेहेत्रे**

सर्वसाधारण सभा गोंधळात आणि गुंडाळून घेण्यात आली सभा आहे. कर्मचारी भरतीत भ्रष्टाचार झाला असे बऱ्यास सभासदांचे म्हणणे होते. तरी सहा महिन्यात त्यांना सातत्य देऊन कायम केले. सभासदांना विचारात घेऊन आणि सभेत करायला हवे होते. संस्थेचा अनाठायी खर्च त्यांनी वाचवायला हवा होता.



**सुभाष म्हस्के, जिल्हाध्यक्ष, कास्टाईब शिक्षक संघटना**

मागील २०१७ पासून विविध हेडच्या नावाखाली होणारी उधळपट्टी आजही विविध कारणांसाठी सुरु आहे संस्थेचे लेखापरिक्षण व कर्मचारी भरतीत अनियमितता झालेली आहे. याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी.



**उद्धव एकनाथ पवार,**
**मराठवाडा उपाध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# पहिलीपासून हिंदी सक्तीविरोधात मराठा महासंघाचे मंगळवारी स्वाक्षरी अभियान

**जालना । प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासनाच्यावतीने शालेय अभ्यासक्रमात इयत्ता पहिलीपासून, मराठी भाषासोबत हिंदी भाषा लादण्याचा खटाटोप चालविला जात आहे. वास्तविक लहान वयात मराठी भाषेबरोबर हिंदी भाषा शिकविणे हे कोवळ्या वयातील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक होऊ शकते. शासनाच्या ह्या निर्णयाचा निषेध म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने राज्यभर सह्यांची मोहीम राबवण्यात येत असून, त्याअंतर्गत मंगळवार दि. १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता जालना शहरातील गांधी चमन येथे सह्यांची मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना, अरविंद देशमुख म्हणाले की, मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी भाषा सक्ती विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. शिवराय, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा लादणं ही मातृभाषेवरची सक्ती आहे. हे फक्त शैक्षणिक धोरण नाही तर मराठी भाषेवरचे नियोजनबद्ध आक्रमण आहे. हे थोपवले पाहिजे. पाचवीनंतर हिंदी अभ्यासक्रमात असतानाही पहिलीतून सक्ती का? हा प्रश्न महाराष्ट्राच्या अस्मितेचा आहे. यावर व्यापक सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक असल्याचे अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाच्या निषेधार्थ सह्या करण्यासाठी सर्व सामाजिक व राजकीय संघटनांनी त्यांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते,समाजबांधव यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, सरचिटणीस संतोष कऱ्हाळे, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, लक्ष्मण उढाण, विद्यार्थी नेते इंजी. शुभम टेकाळे, कामगार जिल्हाध्यक्ष मंगेश मोरे, श्रीकृष्ण यादव, रवीकुमार सूर्यवंशी, अजय कोल्हे, कमलेश काथोटे, दत्ता गव्हाणे, बाळासाहेब देशमुख, कैलास सरकटे, लक्ष्मण गाडेकर यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.



**प्रति पंढरपूर समजली जाणारे जालना येथील आनंदी स्वामींची यात्रा महोत्सवास रविवार (दि २९) रोजीपासून सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशीचे आनंदी स्वामींचे रूप दिसून येत आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)**

## संपादकीय

# वाढती बालगुन्हेगारी ; धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वादातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती. दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीनवर्षापूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एकावर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगर मधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पालकांनो नका ठेऊ मुलांवर अपेक्षांचा भार

आपली मुले दहावी व बारावीला गेल्यावर बहुतांश पालकांच्या मनातील अपेक्षा जाग्या होतात. त्यांची मुलांबद्दल असणारी मानसिक इच्छाशक्ती प्रचंड वाढते. त्यांना वाटत असते की, आपला मुलगा डॉक्टर व्हावा, आपली मुलगी इंजिनीयर व्हावी, आपला मुलगा कलेक्टर व्हावा आणि आपली मुलगी क्लासवन अधिकारी व्हावी, म्हणून अनेक पालक आपल्या अपेक्षांचे ओझे जबरदस्तीने आपल्या मुलांवर सोपवून मोकळे होताना दिसतात. मुलांची मानसिक इच्छाशक्ती त्या क्षेत्रात आहे किंवा नाही याची खात्री न करता केवळ आपली इच्छा म्हणून बहुतांश पालक आपल्या मुलांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रात शिक्षण घेण्यासाठी मजबूर करतात. त्यांची आवड लक्षात न घेता, त्यांचा बौद्धिक कल न ओळखता, त्यांची रुची कोणत्या क्षेत्रात आहे, हे न बघता केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आणि आपल्या मोठेपणासाठी बहुतांश आईवडील आपल्या मुलांना डॉक्टर, कलेक्टर, अभियंता किंवा उच्च पदस्थ अधिकारी होण्यासाठी अपेक्षांचे ओझे त्यांच्या मानगुटीवर लादतात. त्यासाठी भरपूर पैसा ओतून आपल्या मुलांना नामांकित क्लासेसला पाठवतात. चांगल्या व नामांकित कॉलेजला प्रवेश घेऊन देतात. बिचारे मुलेही आई-वडिलांच्या शब्दांचा मान ठेवून त्यांच्या इच्छेप्रमाणे वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रात पदार्पण करतात. आणि त्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. परंतु त्या क्षेत्रात त्यांची म्हणावी तेवढी आवड नसल्यामुळे पहिल्याच प्रयत्नात त्यांना यश काही मिळत नाही. त्यांना यशाचे गाव काबीज करण्यासाठी वाटचाल अपयशाने करावी लागते. तेव्हा कुठे जबरदस्त अडथळ्याची शर्यत पार केल्यावर यश काबीज करता येते. म्हणून वाटचाल करताना कधी कधी अपयशाला सुद्धा पचवावे लागते. अपयशाशिवाय यश मिळवणे शक्य नाही आणि पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होणारा बहाद्दर अजून तरी जन्माला आला नाही.परंतु पालकांना मात्र आपला मुलगा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी व्हावा असे वाटत असते. ते कसे शक्य होईल हो? या जगात जेवढे काही लोक यशस्वी झालेत त्यांना अपयशातून पुढे जावे लागले आहे. हे पालकांनी विसरता कामा नये. पण आजकालच्या पालकांना मुलाचे आलेले अपयश का सहन होत नाही. आपल्या मुलासाठी पालक एवढे क्रूर का बनतात? हे कळायला मार्ग नाही. कारण आजकाल प्रत्येक बापाची अशी मनसिकता झाली आहे की, मुलगा अपयशी झाल्यामुळे आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होईल, आपल्याला मित्रपरिवार, भावकी, गावकी आणि नातेवाईक काय म्हणतील? या भीतीपोटी ते प्रचंड रागात असतात. त्यांना आलेला राग अनावर होत नाही. म्हणून हा राग ते आपल्या मुलांवर काढतात. त्यांना शिवीगाळ करतात. त्वेषाने बेदम मारून खडे बोल सुनावतात. तू माझ्या सामाजिक प्रतिष्ठेचा अपमान केलास. तुला एवढा पैसा ओतून चांगल्या क्लासेसला पाठवले, चांगल्या कॉलेजला प्रवेश मिळवून दिला आणि तू मात्र शेवटी मला यश दाखवण्याऐवजी अपयश दाखवलास. माझी सामाजिक प्रतिष्ठा कमी केलास. म्हणून त्याला बेदम मारहाण केली जाते किंवा घराबाहेर काढले जाते. आता तू आमच्या घरी येऊ नकोस, आम्हाला तोंड दाखवू नकोस, तिकडेच कुठेही जाऊन रहा म्हणून त्याला स्पष्ट भाषेत सुनावले जाते. पण त्या आईवडिलांना कोण सांगणार की, अपयश ही यशाची पहिली पायरी असते. अपयशाच्या वाटेने प्रवास केल्याशिवाय यशाला काबीज करता येत नाही. एखादे अपयश आले म्हणून माणूस संपतो असे समजणे साफ चुकीचे ठरते. जीवनात अपयश आहे म्हणून यशाची व्याख्या करता येते. या जगात दहावी व बारावीला अपयश आलेले कित्येक मुले पुढे चालून हजारो तरुणांचे आयडॉल झाले आहेत. लाखो युवकांचे प्रेरणास्थान झाले आहेत. जे विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात अपयशी ठरतात, ते विद्यार्थी औद्योगिक क्षेत्रात यशस्वी होतात. आणि जे विद्यार्थी औद्योगिक क्षेत्रात अपयशी ठरतात ते विद्यार्थी कृषी क्षेत्रात आपले नाव कमावतात. कारण प्रत्येक विद्यार्थ्याचा कल हा वेगवेगळ्या क्षेत्रात वेगळा असतो. कोणी शैक्षणिक क्षेत्रात हुशार असतो तर कोणी औद्योगिक क्षेत्रात तरबेज असतो. कोणी राजकीय क्षेत्रात चाणाक्ष असतो तर कोणी कृषी क्षेत्रात जाणकार असतो. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांवर कोणत्याच अपेक्षांचे ओझे न ठेवता त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना क्षेत्र निवडण्याची संधी द्यावी. मग पहा ते सुद्धा नक्कीच संधीचे सोने करून दाखवतील. आणि तुम्ही जर त्यांच्यावर नाहक अपेक्षांचे ओझे लादण्याचा प्रयत्न केला तर ते अपेक्षांचे ओझे पेलण्यात अपयशी ठरतील. हे अटळ सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. नुकतेच काही दिवसांपूर्वी सांगली जिल्ह्यात काळजाचा थरकाप उडवणारे एक प्रकरण घडले. ते प्रकरण सध्या सोशल मीडियावर व महाराष्ट्रात सगळीकडे व्हायरल झाले आहे. ते प्रकरण असे होते की, आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात एक धक्कादायक आणि काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली आहे. नीट सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्याच्या रागातून वडिलांनी आपल्या १७ वर्षीय मुलीला बेदम मारहाण केली आणि मारहाणीत मुलीचा जागीच मृत्यू झाला असून संपूर्ण महाराष्ट्रातून या घटनेविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ही मनाला हेलावून टाकणारी घटना ऐकून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. पण सभ्य व सज्जन माणसांसाठी ही खूप हळहळ व्यक्त करणारी दुःखदायक बाब आहे. त्या निर्दयी व क्रूर बापाला पोटच्या गोळ्याला बेदम मारहाण करताना दया व माया कशी काय आली नसेल? त्याचे हृदय एवढे कठोर पाषाणाचे कसे बनले असेल? पोटचा गोळा संपवताना त्याच्यातली सहानुभूती का जागृत झाली नसेल? खरोखरच हे विचार करायला लावणारे प्रश्न आहेत. बारावीच्या सराव परीक्षेत त्या मुलीला थोडेफार कमी गुण मिळाले, म्हणून कायमचे संपवायचे का? पुन्हा जोमाने अभ्यास करून यशाला गवसणी घालता येणार नाही का? मान्य आहे की, त्या मुलीला कमी गुण मिळाले आणि तिला अपयश आले पण तिला अपयश आले म्हणून तिचे सर्व काही संपले का? जगात अपयश आलेल्या व्यक्तीच भविष्यात यशस्वी व्यक्ती म्हणून ओळखल्या जातात.मग तिला अपयश आले तर काय झाले? ती भविष्यात यशस्वी होणार नव्हती का? एवढ्याशा अपयशाने संतापून बापाने टोकाचा निर्णय घ्यावा आणि त्या मुलीला कायमचे ठार करावे, हे खरंच लोकशाही प्रधान देशासाठी योग्य आहे का? विश्व निर्माण करण्यासाठी शून्यातून प्रवास करावा लागतो. हे त्या बापाला कधी कळणार? तशी तर ती मुलगी खूप हुशार होती. गावातील शाळेत दहावी बोर्ड परीक्षेत ती ९२ टक्के गुण घेऊन वर्गात प्रथम आली होती. आणि भविष्यात देखील ती खूप मोठ्या पदावर रुजू होणार होती. पण तिच्या क्रूर बापाला परीक्षेत मिळालेले कमी गुण जिव्हारी लागले होते. त्या मुलीला कमी गुण मिळाले म्हणून जेव्हा त्या बापाला कळाले तेव्हा त्या बापाने मुलीला रागाने खडे बोल सुनावले. तेव्हा मुलीने मुख्याध्यापक बापाला म्हटले की, बारावीला तुम्हाला काय लय गुण मिळाले होते का? तुम्ही काय कलेक्टर झालात का? हे प्रश्न मुलीने बापाला केल्यावर त्या अमानुष बापाने संतापून टोकाचा निर्णय घेतला आणि त्या मुलीच्या डोक्यात वरवंटा घालून तिला रक्ताच्या थारोळ्यात पाडून तिची जीवनयात्रा कायमची संपवली. एका मुख्याध्यापक बापाने स्वतःच्या मुलीला जर अमानुषपणे ठार मारले असेल तर विद्यार्थ्यांनी त्या मुख्याध्यापक शिक्षकाकडून कोणती प्रेरणा घ्यावी? तो मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मार्गदर्शन करण्याच्या लायकीचा असेल का? तो खरच विद्यार्थ्यांना प्रामाणिक न्याय देईल का? त्याला स्वतःची मुलगी नीट जगवता आली नाही तर तो शिक्षकांना, विद्यार्थ्यांना व शाळेला काय सांभाळणार? मला मान्य आहे की, त्या बापाने त्याच्या अपेक्षा पूर्ण न केल्यामुळे व त्याला मुलीने उलटसुलट बोलल्यामुळे मुलीला ठार मारले पण कदाचित असेही झाले असते की, त्या मुलीच्या मानगुटीवर बापाने अपेक्षांचे ओझे लादल्यामुळे मुलगी सुद्धा एकदिवस आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाली असती. कारण आजकाल प्रत्येक आईवडिलांना वाटत आहे की, आपल्या मुलांनी आमच्या मनावर शिक्षण घ्यावे, आमच्या मनावर शैक्षणिक क्षेत्र निवडावे, आमच्या इच्छेप्रमाणे परीक्षेत गुण घ्यावेत, म्हणजे संपूर्ण शैक्षणिक प्रवासच आमच्या मनावर पार पाडावा आणि डॉक्टर, कलेक्टर, इंजिनीयर किंवा उच्च पदस्थ अधिकारी व्हावे आणि आमच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. असे आजकाल बहुतांश पालकांना वाटत आहे. पण हे खरंच शक्य होईल का हो? मुलांना कोणते क्षेत्र चांगल्या प्रकारे हाताळता येते, हे मुलांनाच माहीत असते. त्यांना कोणत्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करता येते, हे पालकांना काय माहित? पालकांना फक्त त्यांच्यावर अपेक्षा लादणे एवढेच माहित... त्यांच्या मनातले ओळखायला सहानुभूती लागते, ती सहानुभूती पालकांमध्ये नाही म्हणून आजकालचे पालक आपल्या मुलांना क्रूर बनून अमानुषपणे ठार मारत आहेत किंवा त्यांना आत्महत्या करण्यास मजबूर करत आहेत. प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. आपल्या आवडी त्यांना कशा आवडतील? आपल्या मनातील इच्छा आणि त्यांच्या मनातील इच्छा वेगवेगळ्या असतात. म्हणून पालकांनो आपल्या मनातील इच्छा त्यांच्या मनावर लादण्याचा प्रयत्न करून त्यांना मरणाच्या खाईत ढकलू नका...मुलांना ज्या क्षेत्राची आवड आहे, त्या क्षेत्रात शिक्षण घेऊ द्या... आणि त्यांना त्यांचे चांगले करिअर करू द्या...सचिन तेंडुलकर दहावी नापास आहे पण दहावीच्या पुस्तकात सचिन तेंडुलकरवर धडा आहे...यशाचा धडा गिरवायला तेवढाच धडा पुरेसा आहे.म्हणजे सचिन तेंडुलकर शिक्षण क्षेत्रात अपयशी ठरला पण क्रीडा क्षेत्रात यशस्वी होऊन तो क्रिकेटचा देव बनला...म्हणून शेवटी समारोप करताना पालकांना माझी विनंती आहे की, आपण आपल्या मुलांना त्यांच्या इच्छेप्रमाणे काहीपण करू द्या...उगीच त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादू नका...ते आपोआप फुलासारखे फुलत राहतील आणि इतरांना सुगंध देतील...



**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# शिक्षण क्षेत्रातील तपस्वी व्यक्तिमत्व; खंडेराव हराळे

शिक्षण क्षेत्रात आपल्या ज्ञान, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाने उजळ इतिहास घडवणारे श्री. खंडेराव रामराव हराळे सर ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. तब्बल ३२ वर्षे सेवा देऊन हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अमूल्य योगदान देणाऱ्या या शिक्षकरत्नाला माझ्याकडून साष्टांग अभिवादन!

ग्रामीण भागातील साध्या घरातून शिक्षणाचा वसा घेतलेले हराळे सर यांचा जन्म हिमायतनगर तालुक्यातील दाबदरी येथे झाला. वडील गावचे पोलीस पाटील होते. सरांनी गावातीलच जिल्हा परिषद शाळेत सातवीपर्यंतचे शिक्षण घेतले. उमरखेड तालुक्यातील बिटरगाव येथील वसंतराव नाईक कृषी विद्यालयात माध्यमिक तर उमरखेड तालुक्यातील जि.प. मा. व उच्च मा. विद्यालय, ढाणकी येथे उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. गोपिकाबाई सिताराम गावडे महाविद्यालय उमरखेड येथे पदवीचे शिक्षण तर इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय, वसंतनगर येथे बी.एड. आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे डी. एड.चे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात सेवा द्यायला १९९३ साली हिमायतनगर येथील बालाजी माध्यमिक विद्यालयात माध्यमिक मुख्याध्यापक पदावर सुरुवात केली. परंतु शैक्षणिक कार्याची कर्मभूमी मात्र भोकर तालुक्यातील भोसीची पो.बे. आदिवासी आश्रम शाळाच ठरली. १९९४ ला येथे जॉईन होऊन त्यांनी आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत ३२ वर्षे इमानेइतबारे सेवा दिली. कार्यकाळात त्यांनी शाळेचा शैक्षणिक आणि सामाजिक विकास घडवून आणला.

श्री. हराळे सरांनी केवळ शिक्षकी पेशा म्हणून काम न करता तो धर्म मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अविरत प्रयत्न केले. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणात पुढे नेण्यात आणि आत्मविश्वास देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी शिकवलेली मराठी आजही माझ्या मनात ठासून भरलेली आहे. हराळे सर हे शिक्षणात शिस्त, संस्कार आणि परिश्रम यांना सर्वोच्च महत्त्व देणारे शिक्षक आहेत. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी ते केवळ शिक्षक नव्हते तर एक मार्गदर्शक, पालक आणि प्रेरणास्रोत ठरले. त्यांनी शाळेला समाजाशी जोडणारा पूल म्हणून भूमिका बजावली. जन्म गावातच आदिवासी समाजाचे सवंगडी असल्याने आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांना कधीही अडचण जाणवली नाही किंवा परकेपणाही वाटला नाही. समाज, सहकारी आणि अधिकारी यांना जाणून घेण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. शैक्षणिक कार्यातही सरांना संघर्ष करावा लागला परंतु ते कधीही डगमगले नाही.आश्रम शाळेतील मुलांबरोबर खेळले,रमले, बागडले आणि शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात सेवा देत असलेले विद्यार्थी घडवले सुद्धा. विद्यार्थी प्रवेशासाठी परिसरातील प्रत्येक गाव पिंजून काढला. यासाठी वडील आणि भाऊ हे भजनी मंडळात असल्याने त्यांच्या ओळखीचा फायदा झाला.



मोठ्या मनाचा उमदा माणूस संचालक श्री राठोड साहेब, संस्थेच्या अध्यक्षा सौ. रेखाताई राठोड यांनी प्रत्येक सहकाऱ्यांवर मुलांसारखी माया केली. माध्यमिक मुख्याध्यापक श्री देशमुख सर, प्राथमिक मुख्याध्यापक श्री लांडगे सर, श्री राठोड सर, श्री पवार सर, श्री खामणेकर, श्री सूर्यवंशी सर, श्री कनशेटे सर, श्री तरटे सर, श्री धनवे सर, श्री टेकाळे सर, श्री दर्शनवाड सर, इंगोले मॅडम, श्री आचनगार सर,श्री जोशी सर, श्री भागानगरे आणि कर्मचारी हे सर्व एका कुटुंबासारखे राहिल्याने सेवाकाळ सुखद गेल्याचे ते सांगतात. पुनर्जन्म मिळाला तर शिक्षकाचा मिळावा अशी ते आवर्जून इच्छा व्यक्त करतात.

दुःख कसे पेलावे पुन्हा कसे जगावे, हे शाळेने शिकवल्याचे ते आठवणीने सांगतात.भट्टीत पोलाद जसा शेकून निघतो असे सरांचे आयुष्य संघर्षाने शेकून निघाले आहे. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितांनी सरांना नेहमीच स्फूर्ती आणि जगण्याची उर्मी दिली. सेवानिवृत्तीमुळे मुलांची सेवा करता येणार नाही. आयुष्यभर मुलांच्या प्रश्नांना उत्तर देणारे सर पण सर,तुम्ही सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्हाला कोण शिकवणार ? प्रश्नाचे मात्र उत्तर देऊ शकले नाही. त्यावेळी ते अतिशय भाऊक झाल्याचे सहकारी शिक्षकांनी सांगितले.

३० जून हा दिवस सरांच्या शैक्षणिक कारकिर्दीचा शेवटचा दिवस असला, तरी त्यांचे कार्य आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहील. त्यांची साधी राहणी, प्रामाणिक वर्तणूक आणि शिक्षणातला आदर्श सर्वांना कायम प्रेरणा देत राहील. त्यांच्या विचारांचा व संस्कारांचा दीपक अनेक विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या मनात तेवत राहील. सरांच्या सेवेला मनाचा मुजरा! सरांना पुढील आयुष्यासाठी कोटी कोटी शुभेच्छा!

**- गंगाधर वानोळे,**
**माजी विद्यार्थी तथा जि.प.शिक्षक**

## सरांची प्रेरणा घेऊन...

शाळेतील मास्तर झालेत भक्षक
वाईट कर्म करून समजतात शिक्षक
अशाने होतोय शिक्षकी पेशा खराब
संध्याकाळी ढोसतात दारू व शराब

वर्गात जातात मुलांना शिकवायला
सांगतात त्यांना शुद्धलेखन लिहायला
शिक्षक मात्र निवांत झोपा काढतात
मुलांचे भविष्य धोक्यात घालतात

काही शिक्षकांना सवय असते घाणेरडी
वर्गात थुंकतात खाऊन गायछाप पुडी
कशी सुसंस्कारी होईल आजची युवा पिढी
शिक्षक मित्रांनो याची जाण राहू द्या थोडी

काही शिक्षक काम चुकारपणा करतात
प्रामाणिक शिकवणाऱ्यांना बदनाम करतात
असते त्यांना शिक्षकांना नावं ठेवायची सवय
याच कर्मात अशा शिक्षकांचे जाते निघून वय

असतात शाळेत काही शिक्षक फार व्यसनी
मोठेपणा सांगताना आणून तोंडाला पाणी
मुलांना सांगतात म्हणायला मराठी गाणी
हीच आहे बहुतांश शिक्षक लोकांची कहानी

काही शिक्षक असतात फार इमानदार
मुलांना शिकवत असतात बनून समजदार
त्यांना टंगळमंगळ करायची सवय नसते
त्यांचे ध्येय फक्त विद्यार्थी घडवायचे असते

मुले घडण्यासाठी शिक्षकाने शिकवावे कसे?
बबनराव गुळवे गुरुजी मुलांना शिकवतात तसे
गुळवे सर खंडाळी प्रशालेचे आदर्श गुरु आहेत
त्यांची प्रेरणा घेऊन शिक्षक आदर्श बनत आहेत

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

जिल्हा क्रीडा अधिकारी यांची चौकशी करुन निलंबीत करा

## केलेल्या कामाचे पैसे दिले नसल्याने आत्मदहन करणार -इस्माईल उस्मान शेख

जालना । प्रतिनिधी - येथील जिल्हा क्रीडा अधिकारी हे जालना येथे कार्यरत झाल्यापासून आजपर्यंत त्यांच्या कार्यालयाच्या विकास कामात मोठ्या प्रमाणात घोटाळ करीत असून त्यात एका ठेकेदाराने केलेल्या कामाचे पैसे देखील दिले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळे आली असून ते येणार्या दोन दिवसात पोलीसांना माहिती देऊन आत्मदहन करणार असल्याचा इशारा काम करणारे इस्माईल उस्मान शेख यांनी दिला आहे.



जालना येथील जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे यांनी इस्माईल शेख यांच्याकडून कागदपत्राची पुर्तता करुन घेत रंगरंगोटी आणि इलेक्ट्रीक कामाचे टेंडर देतो असे सांगून फाईल तयार केली. त्यानंतर इमारतीची रंगरंगोटी करुन घेतली व इलेक्ट्रीकलचे कामही करुन घेतले. क्रीडा कार्यालयाच्या कामाचा ठेका मिळाल्याने खूश झालेल्या इस्माइल शेख यांनी बील सादर केले. मात्र त्यांच्या नावे बील न काढता छत्रपती संभाजी नगर येथील संजय गाडवे यांच्या ओळखीच्या मित्राच्या नावावरच बील काढून पैसे उचलून घेतले असल्याचा आरोप इस्माईल शेख यांनी केला आहे. संजय गाढवे यांनी रंगरंगोटीचे ३ लिफाफे मागवून घेतले. त्यानंतर टेंडर मंजूर केले असल्याचे सांगून ती फाईल इस्माईल यांना दाखविण्यात आली. त्यामुळे इस्माईल यांनी रंगरंगोटी आणि इलेक्ट्रीकलचे काम करुन दिले. त्यानंतर बीलाची मागणी केली असता क्रीडा अधिकारी संजय गाढवे यांनी टाळाटाळ करुन बील दिले नाही. त्यामुळे इस्माईल शेख यांनी त्यांच्या कार्यालयात जावून विचारपुस केली असता त्यांनी सदरील बील हे छत्रपती संभाजी नगर येथील एका एजन्सीच्या नावे काढून घेतले असल्याचे दिसून आले. त्यामुळे संजय गाढवे यांनी इस्माईल शेख यांना कमी रकमेचे टेंडर मंजूर करुन ते त्यांच्या मित्राच्या नावे परस्पर मंजूर करुन त्याचे बील काढून घेतले. वस्तुस्थितीमध्ये शेख इस्माईल यांनी भरलेले टेंडर कमी रकमेचे असून गाढवे यांच्या मित्राच्या नावे काढलेले बील हे जास्तीचे आहे. त्यामुळे संजय गाढवे यांनी इस्माईल शेख यांची फसवणूक करुन शासनाच्या तिजोरीतून स्वतःच्या फायद्यासाठी रक्कम हडप केल्याचा आरोप इस्माईल शेख यांनी केला आहे. त्यामुळे गाढवे यांनी मंगळवार पर्यंत केलेल्या कामाचे पैसे न दिल्यास गुरुवारी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आत्म दहन करणार असल्याचा इशारा इस्माईल शेख यांनी दिला आहे.

## टेंभुर्णी नगरपंचायतीसाठी प्रस्ताव सादर करा

### गटविकास अधिकाऱ्यांचे ग्रामपंचायतला पत्र

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - येथील ग्रामपंचायतचे नगरपंचायत मध्ये रूपांतर करण्याच्या हालचालींना आता आणखी वेग आला आहे. याबाबत नुकतेच गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीला पत्र पाठवून नगरपंचायतीचा प्रस्ताव पाठविण्याबाबत आदेशित केले आहे. यामुळे जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे. २० हजार लोकसंख्येच्या टेंभुर्णी गावाला नगरपंचायतीचा दर्जा मिळावा म्हणून मागील काही महिन्यापासून जनतेने सारखे मागणी लावून धरली आहे. याबाबत नुकतेच विभागीय आयुक्त यांनी देखील जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना टेंभुर्णी नगरपंचायतीबाबत योग्य कार्यवाही करण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. यातच जाफराबाद गटविकास अधिकारी यांनी टेंभुर्णी ग्राम संसद अधिकाऱ्यांना पत्र पाठवून नगरपंचायतीबाबतचा विहित नमुन्यातील प्रस्ताव तीन प्रतीत त्वरित पाठवण्याबाबत आदेशित केले आहे. यासाठी विशेष अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे आता टेंभुर्णी ग्राम पंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा मिळणेबाबत नागरिकांच्या आशा आणखी पल्लवीत झाल्या आहेत. ग्रामपंचायत रद्द होऊन नगरपंचायत अस्तित्वात आल्यास नागरिकांवर कराचा मोठा बोजा वाढेल अशा अशा पद्धतीच्या वावड्या नगरपंचायत अस्तित्वात येऊ नये यासाठी सक्रिय असणाऱ्या कडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायतला जिल्हा परिषद आणि वित्त आयोगाच्या माध्यमातून मिळणाऱ्या निधीला मर्यादा असून नगरपंचायत अस्तित्वात आल्यास नगर विकास विभागाच्या मार्फत रस्ते, पाणीपुरवठा आणि अन्य बाबींसाठी भरीव निधी मिळतो. गावची लोकसंख्या २० हजार असूनही आतापर्यंत गावाला नगरपंचायतीचा दर्जा मिळालेला नाही. गावची वाढती व्याप्ती पाहता ग्राम पंचायत स्तरावरील निधी गाव विकासासाठी अपुरा पडत आहे. यामुळे नागरिकांना अनेक वर्षापासून विविध नागरी समस्यांचा सामना करावा लागत आहे. याबाबत जनतेने वेळोवेळी निवेदने देऊन नगरपंचायतीची मागणी केली आहे. जनतेच्या रास्त भावनांची कदर करीत ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील प्रस्ताव त्वरित वरिष्ठ कार्यालयाला पाठवावा असे माजी उपसरपंच फैसल चाऊस आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना म्हणाले.




### वेळप्रसंगी जन आंदोलन छेडणार - जमधडे

एखाद्या गावाला त्याच्या हक्कापासून रोखणे म्हणजे गाव विकासात अडसर निर्माण करण्यासारखे आहे. अनेक वर्षापासून ग्रामस्थांची मागणी असूनही टेंभुर्णी नगरपंचायतीचा विषय नेहमीच दुर्लक्षित केला जात आहे. नगरपंचायती साठीच्या सर्व अटी व शर्तीची गाव पूर्तता करीत असतानाही नगरपंचायत न होणे हे न उलगडणारे कोडे आहे. आता जर ग्रामपंचायत मार्फत त्वरित प्रस्ताव पाठविला गेला नाही तर यासाठी जनतेमार्फत सामूहिकरित्या तीव्र जन आंदोलन छेडले जाईल असे माजी सरपंच विष्णू जमधडे म्हणाले.

## 'शिक्षण : प्रश्न अनेक - उत्तर एक' गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी** - मराठवाडा शिक्षक संघ जालना आयोजित केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे निमित्ताने शिक्षण प्रश्न अनेक - उत्तर एक या पुस्तकाचे विमोचन येथील मुक्तेश्वर लॉन्स सांस्कृतिक सभागृहामध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सहकार्यवाह तथा नागपूर विभागाचे शिक्षक आमदार मा सुधाकर आडबाले यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात पार पडले. शिक्षकांच्या न्याय मागण्यांना वाचा फोडण्यासाठी व शिक्षकांच्या व्यापक हितासाठी मागील ३५ वर्षापासून सातत्यपूर्ण केलेल्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून शिक्षण क्षेत्रातील कळीच्या प्रश्नावर मान्यवरांच्या लिखाणाच्या माध्यमातून व्यापक पातळीवर चर्चा करावी या सद हेतूने प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन व श्री ज्ञानोबा वरवटे सेवा गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थित आयोजित केला होता या पुस्तकाचे संपादन प्रा पुरुषोत्तम जुने व सहसंपादन जेष्ठ अर्थशास्त्र तज्ञ प्रा मारुती तेगमपुरे यांनी केले आहे या पुस्तकात १९ प्रसिद्ध लेखक, ज्येष्ठ विचारवंत व शिक्षण तज्ञ यांचे लेख आहेत शिक्षणाविषयी असलेले ज्वलंत प्रश्न व त्यावरील उपाय नक्कीच या पुस्तकातून वाचकांना वाचायला मिळतील असे भाष्य प्रसिद्ध साहित्यिक तथा लेखक प्रल्हाद लुलेकर यांनी केले यावेळी केंद्रीय अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव सरचिटणीस राजकुमार कदम यांची समायोजित भाषणे झाली तर सत्कारमूर्ती ज्ञानोबा वरवटे यांनी सत्काराला उत्तर देताना मी माझे उर्वरित आयुष्य संघटनेसाठी तसेच शोषित,पीडित वंचित तसेच अन्यायग्रस्त शिक्षक बंधू भगिनींना न्याय मिळवून देण्यासाठी समर्पित करेल अशी मनीषा व्यक्त केली मराठवाडा शिक्षक संघाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतचा इतिहास संघटनेने आजपर्यंत दिलेली आमदार व त्यांनी केलेले कार्य यांचा आढावा अध्यक्ष रमेश आंधळे यांनी आपल्या समारोपीय भाषणात घेतला कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रेम दास राठोड व आभार प्रदर्शन जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीकार्यकारणी सदस्य आरेफ कुरेशी,जिल्हा उपाध्यक्ष भीमा शंकर शिंदे,जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण, प्रद्युम्न काकड , तालुका अध्यक्ष रमेश गाढे, गणेश मेहेत्रे, जनार्दन कुदर, संजय चव्हाण व प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल यांनी प्रयत्न केले.




## धाकलगांव शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रिजवान पठाण तर उपाध्यक्षपदी दिलीप छत्रै यांची निवड



**धाकलगांव । प्रतिनिधी** - अंबड तालुक्यातील धाकलगांव येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत समितीच्या अध्यक्ष रिजवान पठान आणि उपाध्यक्षपदासाठी दिलीप छत्रै यांची निवड करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक कसाब सर आणि शाळेतील सर्व शिक्षक तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष रिजवान पठान, उपाध्यक्ष दिलीप छत्रै, व सदस्य साईनाथ पवळे, नुसरत मौलाना, सखाराम गायके, नामदेव गाढे, अंकुश राठोड, बबलू शैख, गणेश पवार, प्रभाकर भालेराव, दत्ता गायकवाड, असद पठाण, शमीम पठाण यांचे अभिनंदन करण्यात आले आणि समितीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली आणि सर्वानुमते ही निवड झाली. रिजवान पठान यांनी सांगितले की, ते समिती शाळेच्या विकासासाठी काम करतील. शाळेतील शैक्षणिक आणि भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आपण सर्व जण प्रयत्न करु. तसेच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समिती काम करेल, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्ष रिजवान पठान यांनी पालकांनी समितीवर विश्वास ठेवल्याबद्दल त्यांचे आभार मानले.



# महाराष्ट्र राज्य लिपिकवर्गीय -लेखा संवर्गीय वेतन त्रुटी व पदोन्नती स्तर कृती समितीची राज्यस्तरीय बैठक जालन्यात संपन्न

**जालना | प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद व शासकीय लिपिकवर्गीय-लेखा संवर्गीय कर्मचार्यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी निवारण व पदोन्नती स्तर निर्धारणासाठी गठीत महाराष्ट्र राज्य कृती समितीची राज्यस्तरीय म हत्त्वपूर्ण बैठक २८ जून रोजी जालना जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. या बैठकीस मुख्य निमंत्रक बलराज मगर, समितीचे निमंत्रक अशोक डहाळे, बापूराव पुजरवाड, सागर बाबर, लेखा संघटना अध्यक्ष मिलिंद कांबळे, संतोष जेजुरकर, शालीन माऊलीकर, राज्य कृती समितीचे सक्रिय सदस्य शरद बिरादार, आनंद भिसे,विशाल परदेशी, पंकज गुल्हाने, अरुण जोरवेकर, बापूसाहेब कुलकर्णी, उमाकांत सूर्यवंशी, पवन तलवारे, सलीम पटेल, अशोक कासराळीकर, माधवी पुरी, तसेच लातूर जिल्हाध्यक्ष सुजित कम लापुरे,चंद्रकांत हवा, बालाजी मुतंगे, संग्राम भिंगोले, बद्रीनाथ सुरवसे, आनंद ढगे आणि राज्यभरातील लिपिकवर्गीय कर्मचारी व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कनिष्ठ व वरिष्ठ सहाय्यक पदनामामध्ये बदल करून 'जिल्हा परिषद विकास अधिकारी' हे पदनाम देण्यात यावे आणि त्यांना एस-१५ वेतनश्रेणी लागू करावी. कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्य प्रशासन अधिकारी या पदनामामध्ये बदल करून 'जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी' हे नवीन पदनाम देण्यात यावे व त्यांना एस-१८ वेतनश्रेणी लागू करावी. या मागण्या इंडियन यूनियनच्या वतीने मांडण्यात आल्या आणि त्यास कृती समितीतील सर्व संघटनांनी एकमताने पाठिंबा दिला. याबाबतचा ठराव तातडीने कृती समितीच्या लेटरपॅडवर शासनाकडे येणाऱ्या दोन दिवसांत सादर करण्याचे ठरले. यापुढील कारवाईसाठी कृती समिती शासन दरबारी पाठपुरावा करणार आहे, जेणेकरून लिपिकवर्गीय कर्मचार्यांना लवकरात लवकर लाभ मिळवून देता येईल, असेही बैठकीत ठरविण्यात आले आहे.

आजपर्यंतचा इतिहास आहे लिपिक वर्गीय संघटनेच्या बाबतीत जो काही निर्णय झालेला आहे त्याची चळवळ जालना जिल्ह्यापासून सुरुवात झालेली आहे. त्यासाठी सर्व महत्त्वाचे योगदान जालना जिल्हा परिषदेचे जिल्हाध्यक्ष अनिल भेरे-पाटील व राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण यांचेही संघटनेच्या वतीने जालन्यामध्ये बैठक घेतली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व सदैव पूर्ण लिपिक वर्गीय तुम च्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले.

या बैठकीस अमरावती जिल्ह्यातून पंकज गुल्हाने, संजय राठी, गजानन कोरडे, गिरीश कोठाळे व हेमंत येवले यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

बैठक यशस्वीरीत्या संपन्न झाली असून राज्यातील कर्मचारी वर्गाच्या हितासाठी निर्णायक पावले उचलली जातील, असा विश्वास कृती समितीने व्यक्त केला.

बैठकीचे नियोजन लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनाचे जालना जिल्हा अध्यक्ष अनिल भेरे पाटील व राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण यांनी जालना जिल्ह्याच्या वतीने केले होते.



# मंठ्यात शिवसेना ठाकरे गटाकडून हिंदीच्या जीआरची होळी, जोरदार घोषणाबाजी



**मंठा | प्रतिनिधी -** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार आज २९ जून रोजी शिवसेना तालुका प्रमुख मंठा मा.श्री.प्रदिप बोराडे यांच्या नेतृत्वात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित हिंदी सक्तीच्या आदेशाची होळी आंदोलनात सहभागी होऊन निषेध व्यक्त केला.

मराठी ही केवळ भाषा नसून आपला अभिमान आणि आपली संस्कृती आहे. त्यामुळे मराठीला डिवचण्याचा प्रयत्न आम्ही शिवसैनिक खपवून घेणार नाही. हिंदी सक्तीबाबतचा निर्णय आम्हाला मान्य नाही. बळजबरीने लादण्याचा कुणी प्रयत्न करु नये. आम्ही छत्रपती शिवरायांचे मावळे आहोत. जशास तसे उत्तर देऊ. महाराष्ट्रात चालेल तर फक्त मराठी. इतर भाषांचा आम्ही सन्मान करतो. मात्र आमच्या संस्कृतीवर हल्ला सहन केला जाणार नाही. यावेळी हिंदी सक्तीच्या महाराष्ट्र शासनाच्या जी आर ची होळी करून निर्दशने व निषेध करण्यात आला आदेशाची होळी करतेवेळी मोठ्या संख्येने शिवसैनिक युवासैनिक उपस्थित होते. तालूका संघटक ज्ञानेश्वर सरकटे आनंदा वैद्य युवा सेनेचे डिगांबर बोराडे बाळासाहेब वैद्य आवेस पठाण रवी काळे सचिन चव्हाळ इम्रान पठाण गोरख चव्हाण ऋतिक जाधव संदीप ढेगळे विष्णू वरकड राहुल बोराडे दत्ता गोरे गजानन झोल संजय बोराडे राजेश पवार रामेश्वर बोराडे प्रदीप घोडके प्रवीण पंडित शेख एहसान ऋषी वाघ सचीन घेणे भागवत गिराम प्रकाश हातकडके व शिवसैनिक उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.